**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ राहुल सुरेशराव सातपुते**

**वादीतर्फे सरतपास विधीज्ञ श्री मने यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

प्रकरणात मी माझा पुरावा शपथपत्रान्वये सादर केलेला आहे. मला आता ते शपथपत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे.

२. आता मला दि.१०.१०.२०१३ रोजीचा नि. क्र. ४९ वरील करारनामा दाखवला. त्यावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर एकुण ४ साक्षीदारांच्या सहया आहेत. तसेच लिहुन देणार व लिहुन देणार यांच्या सहया आहेत. माझी सही क्र. ४ वर आहे.

**उलट तपास प्रतिवादी तर्फे श्री पोंगडे वकील साहेब यांच्या मार्फत**

३. माझे शिक्षण १२ वी पर्यंत व आयटीआय झाले आहे. मी ईलेक्टीशीयन म्हणुन काम करतो. मी प्रॉपर्टी डिलर म्हणुन काम करत नाही. करारनाम्याच्या अंदाजे १५ दिवस अगोदर व्यवहाराला सुरुवात झाली होती. त्याबाबतची माहिती मला वादींनी दिली होती. करारनाम्यातील मजकुर माझ्या समोर उमरेड न्यायालयाच्या समोर लिहीण्यात आलेला होता. सदर करारनामा कोणी लिहीला याबाबत मला माहिती नाही. हे खरे आहे की करारनाम्यावर साक्षीदारांचे नावे टंकलिखीत करण्यात आलेले नाही. ती नावे हाताने लिहीण्यात आलेली आहेत. त्यावरील माझे नाव व पत्ता माझ्या हस्ताक्षरात आहे. बाकीच्या साक्षीदारांची नावे व पत्ता त्यांच्या हस्ताक्षरात आहे. शामबाबा यास इंग्रजी लिहीता वाचता येत नाही. हे खरे आहे की, करारनाम्यावर शामबाबा यांचे नाव इंग्रजीत लिहीले आहे. साक्षीदार क्र. १ व २ यांची नावे वेगवेगळया हस्ताक्षरात लिहीण्यात आलेली आहे. करारनामा रुपये तेरा लाख पंचाहत्तर हजाराचा झालेला आहे. करारनाम्याच्या दिवशी अडीच लाख रुपये देण्यात आलेले होते. त्यापैकी एक लाख रुपये रोख दिले होते व दिड लाख रुपयांचा चेक दिला होता. करारनाम्याच्या वेळी नोटरी कोण होते, हे मला माहित नाही. नोटरीचा दस्त उमरेड न्यायालयाच्या समोरील परिसरात झाला होता. नोटरी समोरच सर्व झाले होते. करारनाम्याप्रमाणे व्यवहार एका वर्षात पुर्ण करावयाचा होता. करारनामा झाल्यानंतर या व्यवहारा संदर्भात वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यात काय बोलणे झाले, याबददल मला माहिती नाही. हे मला माहित नाही की वादीने प्रतिवादी क्र. १ ला

दिलेले चेक बाउन्स झाले होते. करारनाम्याची मिळकत ही मोकळा प्लॉट होता. करारनाम्यात काय अटी व शर्ती लिहील्या होत्या हे मला माहिती नाही.

४. माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मधील मजकुर मला वाचुन दाखविण्यात आला. तो मजकुर खरा व बरोबर आहे. सदरचा मजकुर करारनामा नि. क्र. ४९ मध्ये लिहीलेला नाही. सदरचा मजकुर माझ्या शपथपत्रात का नमुद करण्यात आला, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे खोटे आहे की करारनाम्यानंतर वादी यांची उर्वरीत रक्कम देण्याची आर्थिक परिस्थिती नव्हती. वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यात वाद निर्माण झाला याबाबतची माहिती मला न्यायालयात शपथपत्र दाखल केले त्या दिवशी झाली. वादी प्रतिवादी क्र. १ यांना किती वेळा भेटले, नोटीस दिला का याबाबत मला व्यक्तिशः काही माहिती नाही. मला नंतर समजले की प्रतिवादी क्र. १ खरेदी खत करुन देण्यास टाळाटाळ करीत होते. व त्यांनी प्रतिवादी क्र. २ च्या हक्कात खरेदी खत करुन दिले. हे खरे आहे की माझ्या समक्ष करारनामा झाला होता.  हे खरे नाही की करारनाम्याचे वेळी शामबाबा आणि गंगाधर आंभोणे हे दोनच साक्षीदार होते. क्र. ३ चा साक्षीदार कोण आहे हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार क्र. १ व २ हे टंकलेखनात लिहीले आहे आणि साक्षीदार क्र. ३ व ४ हे हाताने लिहीलेले आहे. हे खरे नाही की साक्षीदार क्र. ३ व ४ करारनाम्याचे वेळी हजर नव्हते.

५. हे खरे आहे की माझे वादीसोबत चांगले संबंध आहेत. हे खरे नाही की करारनामा झाल्यानंतर मी व साक्षीदार क्र. ३ व ४ यांनी त्यावर वादीच्या सांगण्यावरुन सहया केल्या. हे खरे नाही की मी कधीही अशा करारनाम्यासाठी नोटरी वकील यांच्या कार्यालयात गेलो नाही व त्यांच्या समोर सहया केल्या नाहीत. हे खरे नाही की मी आज वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे व खोटे शपथपत्र सादर केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड

वि.दि.दावा क्र. १४४/२०१७, चंद्रशेखर वि अब्दुल सलाम   नि.क्र. ८९

दि. २६.०८.२०२५